दिनांक 19/03/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.182

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील घरोघरी जाऊन गोळा केलेल्या कच-याचे घनकचरा डेपोवर वर्गीकरण करणे, घनकचरा डेपो देखभाल करणे, डेपो वरील विविध मशीन चालवणे व देखभाल करणे, डेपोवर गोळा होणारा कचरा जेसीबी मशीनद्वारे कचरा कंपोस्टींग साईट व लँडफिल साईट वर घेऊन जाणे तसेच इतर अनुषंगिक कामे करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 18/03/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ सर्वेक्षणच्या दृष्टीने नगरपरिषद हद्दीमध्ये संकलन केलेल्या कच-यावर दररोज 100% प्रक्रिया होणे महत्वाचे आहे. त्यादृष्टीने विटा नगरपरिषद हद्दीतील घरोघरी जाऊन गोळा केलेल्या कच-याचे घनकचरा डेपोवर वर्गीकरण करणे, घनकचरा डेपो देखभाल करणे, डेपो वरील विविध मशीन चालवणे व देखभाल करणे, डेपोवर गोळा होणारा कचरा जेसीबी मशीनद्वारे कचरा कंपोस्टींग साईट व लँडफिल साईट वर घेऊन जाणे तसेच इतर अनुषंगिक कामे करणे आवश्यक आहे. सदर कामाची मुदत दि.10 फेब्रुवारी 2025 रोजी संपली असून त्यापुढे येणारा खर्च हा न.पा. फंडातुन करावा लागणार आहे. सदर कामास नगरपरिषद प्रशासकीय ठराव नं.163 दि.23/01/2025 ने मुदतवाढ घेणेत आली आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करून मा.कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. सांगली यांचेकडील पत्र जा.क्र./तांमा/540/2025 दि.13/03/2025 ने तांत्रिक मंजूरी मिळालेली आहे. तरी सदरचे कामास 15 वा वित्त आयोग अनुदान / नगरपरिषद फंड / इतर शासकीय अनुदानातून करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा